**कोविड- १९ विषाणूचा प्रादुर्भाव - लॉकडाऊन कालावधीत बेघर/ विस्थापित कामगार व परराज्यातील अडकलेले कामगार यांच्या वेतनात अथवा मजुरीत कोणतीही कपात न करण्याबाबत अथवा त्यांना कामावरून कमी न करणेबाबत..**

महाराष्ट्र शासन,
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
शासन निर्णय, क्रमांक: संकीर्ण २०२०/ प्र. क्र. ४५/काम-९
मंत्रालय मुंबई ४०० ३२
दिनांक ३१ मार्च २०२०

**वाचा :-**१) सचिव, श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार यांचे क्रमांक: एम-११०११/०८/२०२०-मिडिया, दिनांक २० मार्च, २०२० चे पत्र

२) ग्रह मंत्रालय, भारत सरकार, यांचे क्रमांक: ४०-३ /२०२०/ डीएम- आय(ए) दिनांक २९ मार्च, २०२० चे आदेश.

३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: डीएमयु /२०२०/ प्र.क्र. ९२/ डीआयएसएम-1, दिनांक २९ मार्च, २०२०

**प्रस्तावना :-**

संपूर्ण जग कोरोना वायरस Covid-१९ च्या प्रादुर्भावामुळे अत्यंत अडचणींचा सामना करत असतानाच याबाबतच्या गंभीर समस्यांना भारताला देखील सामोरे जावे लागत आहे. त्या विरुद्धच्या एकत्रित प्रयत्नांचा भाग म्हणून यापूर्वी केंद्र शासन व राज्य शासनाच्या संदर्भीय आदेशान्वये कशाप्रकारे खबरदारी घ्यावी व समाजातील कामगार वर्गांना याचा दुष्परिणाम होणार नाही याबाबत काय उपाययोजना करावी या अनुषंगाने सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. खाजगी आस्थापनांवर काम करणाऱ्या कामगार व कर्मचाऱ्यांना मदत करण्याबाबत विशेषता कंत्राटी काम करणाऱ्या कामगारांचे वेतन कमी करू नये अशा सूचना यापूर्वी देण्यात आलेल्या आहेत तसेच जर काही कारणांनी अशा कामगारांना कामावर येता आले नाही तर ते कामावर नसलेला कालावधी देखील त्यांचा पगारी रजेचा कालावधी म्हणून गृहीत धरावा अशी विनंती देखील करण्यात आलेली आहे. ज्यामुळे या कामगारांच्या दैनंदिन जीवनामध्ये अडथळा येणार नाही. या कालावधीत कोणत्याही कामगारांचे वेतन अथवा पगार कमी होणार नाही परिणामी त्यांचे आर्थिक नुकसान होणार नाही याचीही काळजी घेणे आवश्यक आहे.



Scanned with Cam

**शासन निर्णय :-**

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करण्यात आलेल्या लॉकडाऊन संदर्भातील महाराष्ट्र शासनाच्या यापूर्वीच्या आदेशामुळे बंद झालेल्या उद्योग-व्यवसायातील तसेच अन्य दुकाने व इतर आस्थापनातील प्रभावित झालेले कामगार, परराज्यातील विस्थापित कामगार यांच्या संदर्भात आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या कलम २४ नुसार , महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या राज्य कार्यकारणी समितीचा पदसिद्ध अध्यक्ष म्हणून प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत;

सर्व खाजगी आस्थापना, कारखाने, कंपन्या, दुकाने (अत्यावश्यक सेवा आस्थापना वगळून) इत्यादी आस्थापनांचे सर्व कामगार (कंत्राटी, बाहयस्त्रोताद्वारे उपलब्ध करुन घेण्यात आलेले कर्मचारी व कामगार, तात्पुरत्या कालावधीसाठीचे कर्मचारी व कामगार, रोंजदारीवरील कामगार) ज्यांना कोरोना वायरस Covid-१९ च्या प्रादुर्भावामुळे महाराष्ट्र शासनाच्या आदेशामुळे घरी / स्थानबध्द राहावे लागत आहे, अशा सर्व कामगार/ कर्मचारी हे कर्तव्यावर असल्याचे समजण्यात यावे व त्यांना संपूर्ण वेतन व भत्ते अदा करण्यात यावेत.

हे आदेश महाराष्ट्रातील सर्व निमशासकीय, औद्योगिक, वाणिज्यिक, व्यापारी व दुकाने आस्थापनांना लागू राहतील. या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी व्हावी याबाबतची दक्षता सर्व संबंधित कार्यालय प्रमुखांनी घ्यावी.

हा शासन निर्णय www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजोय मेहता )
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य

प्रति,

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/विधानपरिषद) विधानमंडळ सचिवालय, मुंबई
महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय विधानसभा /विधानपरिषद सदस्य
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन सर्व विभाग
सर्व विभागीय आयुक्त, मुंबई
आयुक्त, उद्योग/कामगार/असंघटित कामगार
सर्व जिल्हाधिकारी
सर्व महापालिकाय आयुक्त,
सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका /नगर परिषद



Scanned with Cam